# सहसंचालक, तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय,

**शासकीय तंत्र निकेतन परिसर, गाडगे नगर, अमरावती ४४४ ६०३**

**E-mail:-roamravati.dte@gmail.com Ph.No. :(०७२१) २५७३०२७, २५७२५७७**

**Website: www.jdroamt.org Fax No. : (०७२१) २५७ ७९१३**


क्रमांक विकाअ/शिक्षण/प्रवेश/२०१५/ 7388

दिनांक :- 17/6/2015

प्रति,

**प्राचार्य,**

सर्व पदवीका/पदवी/पदव्युत्तर पदवी सस्था,

अमरावती विभाग.

**विषय :-२१ जुन हा "आंतरराष्ट्रीय योग दिवस" म्हणुन साजरा करण्याबाबत.**

संदर्भ :- १. मा.संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई यांचे पत्र क्रमांक :- २/एनजीसी/२०१५/७८० दिनांक ३ जुन २०१५.

२. या कार्यालयाचे पृ.पत्र क्रमांक विकाअ/शिक्षण/संकीर्ण/२०१५/१३२८ दिनांक १०/६/२०१५.

३. विकाअ/शिक्षण/संकीर्ण/२०१५/१३२९ दिनांक १०/६/२०१५.

उपरोक्त विषयाबाबतचे संदर्भाकीत पत्राचे कृपया अवलोकन करावे. तसेच आपणास कळविण्यात येते की, "आंतरराष्ट्रीय योग दिवस" साजरा करण्याचे अनुषंगाने राज्य, जिल्हा स्तरावरील समन्वयक व संस्था प्रमुखांनी करावयाच्या नियोजित कार्यवाहीबाबतचा कृती आराखडा सोबत जोडलेला आहे.

तेव्हा आपणास कळविण्यात येते की, कृती आराखडयात नमुद केलेल्या सुचनाप्रमाणे कार्यवाही करावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास सादर करावा.

**सहपत्रे :- वरीलप्रमाणे.**

S. P. Pasebant

/प्र सहसंचालक तंत्रशिक्षण,
अमरावती.

**प्रत :- प्रोग्रामर,** तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती यांना संकेतस्थळावर टाकण्यासाठी.

# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई

'आंतरराष्ट्रीय योग दिवस' साजरा करणेबाबतचा कृती आराखडा

दि. ३ जून, २०१५

संयुक्त राष्ट्रसंघाने २१ जून हा 'आंतरराष्ट्रीय योग दिवस' म्हणून जाहीर केलेला असून संदर्भीन पत्रान्वये सर्व व्यावसायिक अभ्याक्रमाच्या संस्थामध्ये दि. २१ जून, २०१५ हा दिवस "योग दिवस" साजरा करण्यास मा. मंत्रीमहोदय (उच्च व तंत्र शिक्षण) यांनी राज्यातील सर्व शैक्षणिक संस्थांमध्ये (पदविका, पदवी, पदव्युत्तर पदवी व पदविकोत्तर पदविका स्तरावरील सर्व शासकीय, अशासकीय अनुदानित व खाजगी विनाअनुदानित अभियांत्रिकी, वास्तुशास्त्र, औषधनिर्माणशास्त्र, हॉटेल मॅनेजमेंट, व्यवस्थापनशास्त्र, एमसीए इ. अभ्यासक्रमाच्या संस्था) आंतराष्ट्रीय योग दिवस साजरा करण्याचे केलेल्या आवाहनास अनुसरून सदर कार्यक्रम प्रभावीपणे राबविण्यासाठी या संचालनायाने दि. ०२.०६.२०१५ च्या आदेशान्वये आपली नियुक्तीर केली आहे. सदर कार्यक्रम प्रभावीपणे राबवण्यासाठी राज्य, विभागीय व जिल्हा स्तरावर समन्वयकांनी खालील निर्देशानुसार कार्यवाही करण्यात यावी.

<u>राज्य समन्वयक</u>

१. सर्व विभागीय समन्वयकांशी संपर्क ठेऊन त्यांना वेळोवेळी येणा-यां अडचणी सोडविण्याबाबत मार्गदर्शन करावे. तसेच त्यांनी केलेल्या कामाचा कार्यपालन अहवाल वेळोवेळी उपलब्ध करुन घेऊन तो एकत्रित करून निम्नस्वाक्षरीकारांस सादर करावा.

२. प्रस्तूत कार्यक्रमांसाठी जिल्हा व तालूकास्तरावरील दि. ५ व ९ जून २०१५ रोजी नियोजित बैठकींचा अहवाल आपल्या विभागीय समन्वयकांकडून प्राप्त करून घेऊन तो एकत्रीत करून दि. ११ जनू, २०१५ रोजी , दि. १८ जून, २०१५ रोजीच्या बैठकीचा अहवाल दि. १९ जनू, २०१५ रोजी निम्नस्वाक्षरीकारांस सादर करावा.

३. दि. २१ जून, २०१५ रोजी योग दिन साजरा केल्याबाबतचा तपशीलवार अहवाल सर्व विभागीय समन्वयकांकडून प्राप्त करुन तो एकत्रित दि. २२ जनू, २०१५ रोजी दुपारी ०५.०० वाजेपर्यंत उपलब्ध करुन द्यावा. सदर अहवालात घेण्यात आलेले विविध कार्यक्रम /स्पर्धा, सहभागी विद्यार्थ्यी, उपस्थित विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेत्तर अधिकारी / कर्मचारी, कार्यक्रमाचे छायाचित्र, याबाबत प्रसिध्द झालेल्या बातम्या तथा तद्अनुषंगिक लेख इ. बाबतचा समावेश असावा.

<u>विभागीय समन्वयक</u>

१. सर्व जिल्हा समन्वयकांशी संपर्क ठेऊन त्यांना वेळोवेळी येणा-या अडचणी सोडविण्याबाबत मार्गदर्शन करावे. तसेच त्यांनी केलेल्या कामाचा कार्यपालन अहवाल वेळोंवेळी उपलब्ध करुन घेऊन तो एकत्रित करून राज्य समन्वयकांना सादर करावा.

२. प्रस्तूत कार्यक्रम राबविण्यासाठी काही अडचणी उद्दभवल्यास त्या राज्य समन्वयकांशी चर्चा करून सोडविण्यात याव्यात.

३. प्रस्तूत कार्यक्रमांसाठी जिल्हा व तालूकास्तरावरील दि. ५ व ९ जून २०१५ रोजी नियोजित बैठकींचा अहवाल आपल्या जिल्हा समन्वयकांकडून प्राप्त करून घेऊन तो एकत्रीत करून दि. १० जनू, २०१५ रोजी , दि. १८ जून, २०१५ रोजीच्या बैठकीचा अहवाल त्यांच दिवशी संध्याकाळी ०५.०० वाजाता राज्य समन्वयकांकडे सादर करावा.

४. दि. २१ जून, २०१५ रोजी योग दिन साजरा केल्याबाबतचा तपशीलवार अहवाल सर्व जिल्हा समन्वयकांकडून प्राप्त करुन तो एकत्रित दि. २२ जनू, २०१५ रोजी सकाळी ११.०० वाजेपर्यंत उपलब्ध करुन द्यावा. सदर अहवालात घेण्यात आलेले विविध कार्यक्रम /स्पर्धा, सहभागी विद्यार्थ्यी, उपस्थित विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेत्तर अधिकारी / कर्मचारी, कार्यक्रमाचे छायाचित्र, याबाबत प्रसिध्द झालेल्या बातम्या तथा तद्अनुषंगिक लेख इ. बाबतचा समावेश असावा.

५. सर्व विभागीय समन्वयांना सूचित करण्यात येते की, आपल्या कार्यक्षेत्रातील सर्व व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या (जिल्हा, तालूका व गांव पातळीवरील संस्था) शैक्षणिक संस्थाना सदर कार्यक्रमात सहभागी होण्यासाठी

प्रोत्साहीत करावे. तसेच सदर संस्थाना कार्यक्रमाची रुपरेषा व याबाबत अडचणी सोडवण्यासाठी थेट जिल्हा समन्वयकांशी संपर्क साधण्यास आपल्या स्तरावरुन सूचना देण्यात याव्यात.

जिल्हा समन्वयक

१. जिल्हातील व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या सर्व शैक्षणिक संस्थाना (पदविका, पदवी, पदव्युत्तर पदवी व पदविकोत्तर पदविका स्तरावरील अभियांत्रिकी, वास्तुशास्त्र, औषधनिर्माणशास्त्र, हॉटेल मॅनेजमेंट, व्यवस्थापनशास्त्र, एमसीए इ.) दि. २१ जून हा "आंतरराष्ट्रीय योग दिन" साजरा करण्यास प्रोत्साहीत करावे. याबाबत संस्था प्रमूखांशी संपर्क ठेऊन त्यांना वेळोवेळी येणा-या अडचणी सोडविण्याबाबत मार्गदर्शन करावे. तसेच त्यांनी केलेल्या कामाचा कार्यपालन अहवाल वेळोवेळी उपलब्ध करुन घेऊन तो एकत्रित करून विभागीय समन्वयकांना सादर करावा.

२. प्रस्तूत कार्यक्रम राबविण्यासाठी काही अडचणी उद्‌भवल्यास त्या विभागी तथा राज्य समन्वयकांशी चर्चा करून सोडविण्यात याव्यात.

३. प्रस्तूत कार्यक्रमांसाठी जिल्हा स्तरावरील दि. ५ व १८ जून २०१५ रोजी नियोजित बैठकींचा अहवाल विभागीय समन्वयकांना त्वरीत सादर करावा. दि. ०९ जनू, २०१५ रोजी नियोजित तालूका स्तरावरील बैठकीचा अहवाल प्राप्त करून घेऊन तो एकत्रीत करून त्वरीत विभागीय समन्वयकांकडे सादर करावा.

४. "आंतरराष्ट्रीय योग दिन" सादर करण्याच्या अनुषंगाने जिल्हा शिक्षण अधिकारी / जिल्हा क्रिडा अधिकारी यांचे संपर्कात राहून त्यांचे निर्देशानुसार कार्यवाही करावी.

५. दि. २१ जून, २०१५ रोजी योग दिन साजरा केल्याबाबतचा तपशीलवार अहवाल सर्व संस्था प्रमूखांकडून प्राप्त करुन तो एकत्रित करून त्वरीत विभागीय समन्वयकांना उपलब्ध करुन द्यावा. सदर अहवालात घेण्यात आलेले विविध कार्यक्रम /स्पर्धा, सहभागी विद्यार्थ्यी, उपस्थित विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेत्तर अधिकारी / कर्मचारी, कार्यक्रमांचे छायाचित्रं, याबाबत प्रसिध्द झालेल्या बातम्या तथा तद्अनुषंगिक लेख इ. बाबतचा समावेश असावा.

शैक्षणिक संस्था प्रमूख

१. दि. २१ जून रोजी "आंतरराष्ट्रीय योग दिवस" साजरा करण्याचे नियोजित असून आपण आपल्या संस्थेत दि. २१ जून, २०१५ रोजी विद्यार्थ्यी व सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर अधिकारी / कर्मचारी यांनी उपस्थित राहून साजरा करावा.

२. प्रस्तूत कार्यक्रम राबविण्यास राज्यातील सर्व जिल्हयासाठी जिल्हा समन्वयकांची नियुक्ती केली असून त्याबाबतचे आदेश या संचालनालयाच्या संकेतस्थळी प्रसिध्द करण्यात आलेले आहेत. सदर आदेशात जिल्हा समन्वयकांचा संपर्क क्रमांक दिला असून प्रस्तूत कार्यक्रम राबविण्यासाठीची रुपरेषा व तद्अनुषंगीक माहिती तथा अडचणींबाबत जिल्हा समन्वयकांशी समन्वय साधून योग दिन साजरा करण्यात यावा.

३. तालूका तथा गांव पातळीवरील संस्था प्रमूखांना सूचित करण्यात येते की प्रस्तूत प्रकरणी तालुका स्तरावरील गट शिक्षण अधिकारी यांचे संपर्कात राहून त्यांचे निर्देशानुसार कार्यवाही करण्यात यावी.

४. आंतरराष्ट्रीय योग दिवस साजरा करतांना संस्था स्तरावर, विभागीय स्तरावर विविध स्पर्धा, योगाचे महत्व व त्याचा प्रसार याबाबत वकृत्व स्पर्धा, निबंध स्पर्धा इ. चे आयोजन दि. १५ ते २१ या कालावधीमध्ये करण्यात यावे. विविध लेख वेगवेगळया माध्यमातून प्रसिध्द करण्यात यावेत व यास जास्तीत जास्त प्रसिध्दी देण्यात यावी. तसेच सदर कार्यक्रमात उत्कृष्ठ कामगिरी करणा-यांना पारितोषिके / प्रमाणपत्रे देण्यात यावेत.

५. दि. २१ जून, २०१५ रोजी संस्थेतील जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना उपस्थित राहण्यासाठी विविध माध्यमातून आवाहन करण्यात येऊन सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर अधिकारी / कर्मचारी यांना उपस्थित राहण्यासाठी सूचना देण्यात येऊन घेण्यात येणा-या विविध स्पर्धामध्ये सहभागी होण्यासाठी प्रोत्साहीत करावे.

६. पावसाळा सुरू होण्याची शक्यता लक्षात घेऊन नियोजित कार्यक्रमास अडथळा येऊ नये व सहभागी होणा-यांना कोणत्याही प्रकारची गैरसोय होऊ नये यासाठी योग्य ती जागा निवडण्यात यावी जेणेकरून कार्यक्रम यशस्वी पार पाडला जाईल.

७. संस्थेमध्ये अशा प्रकारची जागा उपलब्ध नसल्यास उपलब्ध वर्गखोल्यातील / ड्राईंग रुम मधील फर्निचर तात्परते बाहेर काढून अशा ठिकाणी कार्यक्रम घेण्यात यावा.

अखिल भारतीय तकनीकी शिक्षा परिषद्

# ALL INDIA COUNCIL FOR TECHNICAL EDUCATION

(भारत सरकार का एक सांविधिक निकाय)
(A STATUTORY BODY OF THE GOVT. OF INDIA)

डॉ. अविनाश एस. पंत
Dr. Avinash S. Pant
अध्यक्ष (कार्यवाहक)
Chairman (Acting)

F.No.1-CM/AICTE/2015/
19.05.2015

To

**All the Directors/Principal of AICTE Approved Institutions.**

Sir,

The 69th session of United Nations General Assembly adopted by acclamation draft resolution for observing the International Day of Yoga on 21st June every year. The idea for declaring an International Day of Yoga at the United Nations was formally proposed by Hon'ble Prime Minister of India in his maiden address to the 69th U.N.G.A. on 27th September 2014. The Govt. of India has decided to give practical effect to the resolution by ensuring that the Ist International Day of Yoga is commemorated in a befitting manner on 21st June, 2015.

You are requested to kindly observe the International Day of Yoga on 21st June in your institution. It is further requested that the following activities may be conducted as a part of celebration of International Day of Yoga on 21st June, 2015:

i) In the morning a demo by Yoga practitioners may be organized. The willing students and faculties of the institutions may practice Yoga as shown by the practitioners. The other students and faculties may however observe the same.

ii) The best participants of Yoga may be awarded with prizes and certificates in a function to be organized on that day.

iii) Yoga exhibitions on Yogic postures may be organized in a hall or open space. The banners in this regard may be displayed for awareness in the campus.

iv) Online essay competition may be organized and the best essay may be awarded with prizes and certificates.

v) Promotional films and other information, education and communication material on Yoga may also be distributed on the occasion.

You are requested to observe the International Day of Yoga on 21st June, 2015 by conducting the above mentioned activities in your institutions and communicate a detailed report to AICTE by e-mail: egovernance@aicte-india.org.

With regards,

Yours sincerely,

19/5/15

(Avinash S. Pant)

04 JUN 2015

7th Floor, Chanderlok Building, Janpath, New Delhi-110 001
Ph.: +91-11-23724195 Fax: 23724198 Website: www.aicte-india.org